# स्त्रीस्वातंत्र्य – गर्भपात आणि धर्मांधता

पुरन्दरे चन्द्रशेखर

स्त्रीस्वातंत्र्याच्या संदर्भात दोन पैलूंवर या लेखात विचार आहे.

**गर्भपात**

World Health Organisation [WHO] च्या आकडेवारीनुसार गर्भ नको असताना गर्भधारणा झाली तर दहातील सहावेळा गर्भपाताची वेळ येते. एरवी दहातील तीन गर्भधारणा गर्भपातापर्यंत येतात. जगात दरवर्षी एकूण सुमारे सव्वासात कोटी गर्भपात होतात. गर्भपात करण्यासाठी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता असलेल्या वैद्यकीय कर्मचाऱ्यानेच तो करणे जरुरीचे असते, अन्यथा स्त्रीच्या जीवाला धोका पोहोचून टाळता येणारा मृत्यू होऊ शकतो, इतर मानसिक दुष्परिणाम आयुष्यभरासाठी संभवतात. त्याचा ताण अर्थातच प्रामुख्याने स्त्रीवर येतो पण त्याची अप्रत्यक्ष किंमत देशाची आरोग्यसेवा, समाजही मोजतो. जगात सुमारे ४५ टक्के गर्भपात धोक्याच्या मार्गाने होतात. त्यातील ९७ टक्के विकसनशील देशांत होतात. यात जवळजवळ ८ टक्के स्त्रिया मरण पावतात. योग्य वेळी, स्त्रीची प्रतिष्ठा राखणारा, परवडणारा आणि सुरक्षित गर्भपात हा सार्वजनिक आरोग्य सेवेचा आणि मानवी हक्काचा भाग असला पाहिजे.

दुसऱ्या शब्दांत स्त्रीचे स्वत:च्या शरीरावर नियंत्रण असावे का नसावे या प्रश्नावर गर्भपाताचा मुद्दा आधारित रहातो.

अनेकदा गर्भपात विशिष्ट परिस्थितीत एकमेव पर्याय असतो. उदा. अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाला आणि तिला गर्भ राहिला, एखाद्या गर्भनिदानात असे आढळले की तो गर्भ वाढवणे मातेच्या जीवाला धोकादायक आहे किंवा जन्माला येणारे मूल एखाद्या दुर्धर विकाराने कायम ग्रस्त राहील, त्याची मानसिक वाढ खुंटलेली राहील, वगैरे. या संदर्भात परत हे लक्षात ठेवले पाहिजे की अशी जीवन–मृत्यूची ऐरणीवरची परिस्थिती ठरवायला त्या ठिकाणचे वैद्यकीय कर्मचारीच गर्भपाताचा निर्णय घ्यायला समर्थ असतात. याबाबत कायदा अप्रस्तुत असतो पण बहुधा कायदा गर्भपात करायचा का नाही हे ठरवतो आणि बऱ्याच ठिकाणी गर्भपात अमान्य करतो, गर्भपात हा गुन्हा ठरतो.

विशिष्ट शारीरिक परिस्थितीचे वरील वैद्यकीय मुद्दे सोडा, पण एरवीही, कोणत्याही स्त्रीला कोणत्याही संबंधांनी राहिलेला गर्भ ठेवायचा का नाही हे ठरवण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असायला हवे. वास्तवात ते नसते. तिचे नातलग, जवळचे लोक, उपलब्ध वैद्यकीय सेवा, पैसा, संधी अशा अनेक इतर घटकांनी तिच्यावर दडपण येते. गर्भपात हा गुन्हा ठरवणारा कायदा त्यात भर घालतो. म्हणजे, अशा स्त्रीला मदत करण्याऐवजी कायदा तिला संभाव्य गुन्हेगार ठरवतो.

या कोंडीचे स्त्रीवर अनिष्ट परिणाम होतात. ते सगळे जगभर जिथे गर्भपात बेकायदेशीर आहे, किंवा अगदी अपवादात्मक परिस्थितीतच बेकायदेशीर नाही, त्या देशांत दिसतात. ‘अगदी अपवादात्मक‘ परिस्थिती म्हणजे आईच्या मानसिक आणि/ किंवा शारीरिक आरोग्याला निश्चित धोका असणे. त्याखेरीज, कोणत्याही कारणाने या देशांत गर्भपात बेकायदेशीर असतो.

मग गर्भपातासाठी स्त्रिया छुप्या मार्गांचा अवलंब करतात. इंटरनेट, महागडा गुप्त शिक्षित वैद्यकीय सल्ला हे शहरात शक्य असते पण ग्रामीण भागात जास्त करून त्या अपात्र वैदूंकडे धाव घेतात आणि जीव धोक्यात घालतात.

वरील पार्श्वभूमीवर मेक्सिकोचे उदाहरण पहाण्यासारखे आहे. अनावश्यक कायदे रद्द केले तर मानवी हक्क सुरक्षित रहातात हे त्यावरून दिसते. मेक्सिको अमेरिकेच्या दक्षिण सीमेवरचा देश आहे. सांस्कृतिक दृष्ट्या तो अमेरिका देशापेक्षा दक्षिण अमेरिका खंडातील देशांसारखा आहे. या भागात कॅथॉलिक चर्चचा प्रभाव जास्त व त्याला गर्भपात नामंजूर. म्हणून देशात गर्भपात आजवर गुन्हा होता. स्त्रिया इतर जोखमीच्या मार्गांचा अवलंब करत असत.

पण या सप्टेंबरमध्ये मेक्सिकोच्या सर्वोच्च कोर्टाने गर्भपात कायदेशीर ठरवला आणि स्त्रियांच्या अनेक वर्षांच्या आंदोलनाला यश मिळाले. हा मोठाच पुरोगामी निर्णय आहे. आजवर ती स्त्री

तर गुन्हेगार असेच पण गर्भपात करणारे आरोग्यसेवकही गुन्हेगार असत. आता देशाच्या आरोग्यसेवेत गर्भपाताची तरतूद झाली आहे.

द. अमेरिका खंडातील अनेक देशांत गर्भपात संपूर्णपणे बेकायदेशीर आहे किंवा अंशत:च कायदेशीर आहे. तेथील अशा चळवळींना मोठाच आधार मिळाला आहे.

या संदर्भात घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याच्या अमेरिकेचा उल्लेख करायला हवा. तेथे १९७३ पासून स्त्रियांना गर्भपाताचा हक्क होता. मागच्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाने तो हक्क रद्द केला. अनेक राज्यांनीही तातडीने त्यांचा कायदा बदलला व गर्भपात बेकायदेशीर केला. त्या खोलात जाण्याची जरूरी नाही पण या निर्णयाने आजवरचे ते स्त्रीस्वातंत्र्य सरकारने हिरावून घेतले आहे. उजव्या गर्भपातविरोधी गटांना मोठाच विजय प्राप्त झाला आहे.

**धर्मांधता**

धर्मांधता हे अधिकृत शासकीय धोरण झाले तर लोकांचे, त्यातही स्त्रियांचे, दमन काय स्तराला जाऊ शकते याचे इराण हे उदाहरण आहे.

जिना महसा अमिनी ही इराणच्या कुर्दस्तान प्रदेशात राहणारी कुर्द वंशाची २२ वर्षांची तरुणी. ती भावाला भेटायला तेहरान या इराणच्या राजधानीला आली. तेथे राजवटीच्या इस्लामच्या आकलनानुसार तिने बुरखा नीट घातला नव्हता हा तिचा गुन्हा झाला. तिला प्रथम अटक करण्यात आली. अटकेत अनन्वित हाल करण्यात आले, इतके, की ती कोमात गेली व १६ सप्टेंबरला मृत्यू पावली. या 'धार्मिक–नैतिक' पोलिसी अत्याचाराविरुद्ध इराणमध्ये सार्वजनिक निषेधाची लाट उसळली. उल्लेखनीय म्हणजे इराणसारख्या जुलुमी स्त्रीद्वेष्ट्या राजवटीत या निषेधात स्त्रियांचा सहभाग मोठा होता. निषेध पोलिसांबरोबरच कडव्या इस्लामी राजवटीविरुद्ध होता. स्त्रियांनी रस्त्यावर येऊन बुरख्यांची होळी केली, केस कापले. या घटनेची मागच्या ऑक्टोबरच्या 'आंदोलन' मध्ये सविस्तर नोंद घेतली आहे..

निषेधक राजसत्तेला आव्हान देऊ लागले, विशेषत: इराणचा सर्वेसर्वा आयातोल्ला खोमेनीचा वैयक्तिक धिक्कार करू लागले, त्याचे फोटो रस्त्यावर पायदळी तुडवण्यात आले. मग सरकारने उघडउघड दमनशाही सुरू केली. अशा वेळी एकाधिकारशाही नेहेमीच 'विरोधक देशद्रोही आहेत' असा प्रचार करतात. त्यात इराणमध्ये या लोकांना धर्मद्रोहीही ठरवण्यात आले. म्हणजे, एकतर लोकांच्या मनात निषेध धर्मिकदृष्ट्या समर्थनीय आहे का नाही असा संदेह निर्माण करण्याचा प्रयत्न झाला, दुसरे म्हणजे, पोलिसी व निमलष्करी दलांना मनमानी हिंसा करायला मुभा देण्यात आली. निषेध मोर्चे पोलिसांनी अनावश्यक हिंसेने दडपले. पण तरी ते चालूच राहिले. Woman Freedom Life अशी विरोधकांची घोषणा होती.

Iran Human Rights या नॉर्वेमधील संघटनेच्या आकडेवारीनुसार महसाच्या मृत्यूनंतरच्या वर्षभरात तिच्या हत्येचा निषेध करणाऱ्या ५३७ विरोधकांना देशाच्या सुरक्षा सैनिकांनी ठार मारले तर दुसऱ्या एका संघटनेच्या अंदाजानुसार सुमारे वीस हजाराहून अधिक निषेधकांना अटकेत टाकण्यात आले. 'देवाचा अपमान केला' या आरोपाखाली तीन लोकांना फाशीही देण्यात आली.

तिच्या शासकीय खुनाला या १६ सप्टेंबरला एक वर्ष होणार व तेव्हा परत निषेध उसळणार याचा अंदाज घेऊन राजवटीने लोकांवर करडी नजर ठेवली. face recognition च्या तंत्रज्ञानाने, जमावातील प्रत्येक व्यक्तीची ओळख पटते. त्याचा वापर सरकारने आधीही मोर्चातील लोकांच्या अटकांसाठी केला होता, आताही केला. बुरखा न घालणाऱ्या स्त्रियांचेही फोटो काढले जातात व त्यांच्यावर कारवाई होते.

तिच्या गावातील तिच्या दफनभूमीचे रस्ते बंद करण्यात आले. कोणत्याही प्रकारे तिच्या मृत्यूची शोकसभा भरवण्याची बंदी घातली गेली. तिच्या वडिलांना अल्पावधीसाठी पोलिस कस्टडीत ठेवले. त्यांना घराबाहेर जायला, तिच्या दफनस्थळाला भेट द्यायला बंदी केली. तिच्या घरावर आणि त्या गावावर हेलिकॉप्टर्सने पहारा होता, इंटरनेटही त्या भागात बंद करण्यात आले जेणेकरून लोक एकमेकाच्या संपर्कात रहाणार नाहीत. तिच्या काकांना आधीच अटक करण्यात आली होती. तिच्या वकिलावर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला आहे.

राजधानी तेहरानमध्ये पोलिस बंदोबस्त कडक होता.

**(पान ३४ वर)**

**(जगभर: पान २० वरुन)**
त्यामुळे मोठे मोर्चे निघाले नाहीत पण तुरळक ठिकाणी लोकांचा पोलिसांशी संघर्ष झाला. इमारतींच्या छतावर, बाल्कनीत उभे राहून लोकांनी 'हुकूमशहा मुर्दाबाद', Woman, Life, Freedom अशा घोषणा दिल्या. इराणमधील इतर शहरातही पोलिस विरुद्ध लोक असे संघर्ष झाले, काही ठिकाणी पोलिसी हिंसेत लोक गंभीर जखमी झाले,

या १६ सप्टेंबरला ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, ब्रिटन अशा काही देशातही निषेध मोर्चे निघाले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क समितीनुसार तिच्या हत्येनंतर राजवट अधिकच कडवट होत आहे. स्त्रिया, मुली यांच्या धार्मिक, अभिव्यक्ती व शांततेने एकत्र येणाच्या स्वातंत्र्यावर बंदी वाढत आहे. तसे नवीन कायदे सरकारच्या विचाराधीन आहेत. या समितीच्या अध्यक्षांच्या शब्दांत मुळात तिला अटक होण्याचीच जरूरी नव्हती.

म्हणजे, वस्तुत: स्त्रियांनी बुरखा वापरायचा का नाही हा निर्णय त्यांचा त्यांनी घ्यावा, त्यात सरकारने हस्तक्षेप करणे चूक आहे. त्याऐवजी सरकार धर्माच्या नावाखाली हा प्रश्न प्रतिष्ठेचा करत आहे. त्याचा मूळ उद्देश लोकांवर दहशत बसवणे हा आहे. राजवटीला विरोध किती महागात पडू शकतो, हा इशारा महसाच्या खुनाने दिला आहे.तरीही लोकांना वर्षभरात तिचे विस्मरण झालेले नाही हे महत्त्वाचे.

artnondeco@yahoo.co.uk
purandarearts.com